जन वाचन आंदोलन

जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. बालके व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आजही गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किंमती परवडत नाहीत. अशा नववाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समुदायने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल ?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. लोकांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.

देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. पुस्तक म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

किंमत - २५ रू.

कर्मवीर

प्रा.भास्कर भोळे

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

पुस्तकाचे नाव : कर्मवीर
लेखक : प्रा. भास्कर भोळे
चित्रकार : यश कळवणकर
(युथ आर्टिस्टस् ऑर्गनायझेशन, पुणे)
निर्मिती सहाय्य : संतोष विठ्ठल शेंडकर
जवाआं / म २५
प्रकाशन : ऑगस्ट २०२३ द्वितीय आवृत्ती

मूल्य : २५ रूपये
बालवाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समुदायतर्फे
चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन
आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित.

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समुदाय
(महाराष्ट्र)

प्रकाशक : संतोष विठ्ठल शेंडकर
सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
३०५, आधार अपार्टमेंट, नारायण पेठ,
पुणे - ४११०३०
ई-मेल : mahabgvs@gmail.com

अक्षर जुळणी : भारती जाधव
मुद्रण : संकेत ऑफसेट, करंजेपुल

कर्मवीर

देवगोंडा पाटील एक छोटे शेतकरी. जैन मठाचे कारभारी. एके दिवशी शेजारच्या गावातले एक भांडण मिटवायला गेले, भांडण मिटले. समझोता झाला. करार कागदावर लिहिला गेला. लोक म्हणाले, "देवगोंडा, साक्ष म्हणून सही करा". देवगोंडा नम्रपणे म्हणाले, " वयानं माझ्यापेक्षा मोठ्या माणसाची सही घ्या. माझी कशाला ? "

पण परत येताना देवगोंडाचे मन त्यांना खाऊ लागले. नम्रपणाचं खरं कारण काय होतं. त्यांना स्वत:ला सहीच करता येत नव्हती. ते निरक्षर होते!

घरी आल्या आल्या त्यांनी आपल्या मुलाला पायगोंडाला शेतातून बोलावून घेतले. पायगोंडाला त्यांनी शाळा अर्धवट सोडायला लावली होती. त्यांना आपली चूक उमगली. आपल्या मुलावर आपल्यासारखा लाजिरवाणा प्रसंग येता कामा नये असे त्यांना वाटले. बैलगाडीत सामान भरून त्यांनी पायगोंडाला शिकायला आष्टा नावाच्या गावी पाठवले. पायगोंडा शिकून पुढे सरकारी नोकरीत लागला.

या पायगोंडा पाटलाचा मुलगा म्हणजे भाऊराव. २२ सप्टेंबर १८८७ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज गावी त्यांचा जन्म झाला. त्याने पुढे रयतेच्या दृष्टिने शैक्षणिक क्रांती घडवून आणली. तमाम महाराष्ट्राला ललामभूत झाला.

पूर्वी आपल्या देशात शिक्षण कसे होते? ते बरेचसे धार्मिक असे. शिकण्याचे काम पुरोहित, मुल्लामौलवी करत. शिक्षण फारच थोड्या लोकांना दिले जाई. फक्त वरच्या थरातल्या मुलांना. खालच्या थरातल्या

लोकांसाठी शिक्षणाचा विचार कोणी करत नसे.

मग इंग्रजांचे राज्य आले. नव्या विद्या आल्या. नवे शिक्षण आले. नवे कायदे आले. कारखाने आले. तरीपण परिस्थिती फारशी बदलली नाही. एकच फरक झाला. तेच वरचे वर्ग आता इंग्रजी विद्या शिकू लागले. ती विद्या महागडी होती. रोजच्या जगण्याशी तिचा संबंध नव्हता. तिचा फायदा एकच होता. जे शिकत त्यांना अधिकाऱ्याच्या जागा मिळत. बहुजन समाजातल्या काही लोकांपर्यंत शिक्षण पोचू लागले होते. पण अशिक्षित समाजाची कोंडी मात्र तशीच होती.

महात्मा जोतिराव फुले यांनी प्रथम या अन्यायाला वाचा फोडली. स्त्रिया, शेतकरी-शेतमजूर, अस्पृश्य मानलेल्या जातींचे लोक यांची बाजू घेतली. शिक्षणावाचून त्यांची कशी दैना झाली आहे हे त्यांनी उकलून सांगितले. गोपाळ कृष्ण गोखले यांनी सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे अशी मागणी केली. छत्रपती शाहू महाराजांनी सर्व मागास जातींच्या, गरिबांच्या मुलांसाठी वसतिगृहे काढली. त्यांच्या शिक्षणाची सोय केली. महात्मा गांधींनी बुनियादी तालिम व्दारे सामाजिक क्रांती घडवण्याचे स्वप्न रेखाटले.

बंडखोर भाऊराव

भाऊराव याच काळात लहानाचे मोठे झाले. थोर कर्मवीर ठरले. लोक मात्र त्यांना भाऊराव अण्णा म्हणूनच ओळखत.

अण्णा लहानपणापासूनच मित्रांच्या टोळक्याचे म्होरके. पट्टीचे पोहणारे, दणकट शरीरप्रकृतीचे, धाडसी व प्रामाणिक व्यक्ती होते.

त्यांच्या शेजारी एक पारशी गृहस्थ राहत. त्यांच्या सांगण्यावरून

पायगोंडांनी भाऊरावांना हायस्कूलात पाठवले. डोक्यावर बोजा घेऊन दहा मैल चालत भाऊराव कुंडल स्टेशनला गेले.

अण्णा पहिल्यापासून स्वाभिमानी व साधे होते. ते लंगोटी, सदरा घालूनच कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये गेले. त्यांचा वेश पाहून मुलं हसली.

भाऊरावांकडे उत्तम वक्तृत्व होते. ते बुध्दिमान होते. पण अभ्यासात ते कधीच चमकले नाहीत. वडिलांची इच्छा होती भाऊरावांनी पदवीधर व्हावे. ते घडले नाही. पण पुढे भाऊरावांमुळे लाखो बहुजन युवक पदवीधर बनू शकले.

भाऊराव शिक्षकांमध्ये प्रिय होते. कारण कोणतेच काम ते कधीही टाळत नसत. अपार कष्ट करण्याची त्यांची नेहमीच तयारी असे. मनापासून ते श्रमाचे मोल जाणत.

ते जैन बोर्डिंगमध्ये राहत होते. त्या काळी कोल्हापूरात सामाजिक सुधारणेचे वारे जोमात वाहत होते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी शाहू महाराज अनेक अंगानी प्रयत्न करत होते. त्यावर लोकांमध्ये उलटसुलट विचार उमटत होते. तरूण भाऊरावांच्या मनावर त्याचा खोल परिणाम होत होता. खुळ्या समजुती व सामाजिक विषमता पाहून त्यांना चिड येत असे. बोर्डिंगात जेवताना विद्यार्थ्यांना सोवळे नेसण्याची सक्ती होती. जेवल्यानंतर दाढी करू नये असा नियम होता. भाऊरावांच्या बुध्दीला हे प्रकार पटत नसत. ते सरळ विरोध करत.

भाऊराव एकदा घरी आले होते. त्यांचा घोलप नावाचा मित्र भेटायला घरी आला. तो अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतला होता. त्याला घेऊन भाऊरावांना कोल्हापूरला जायचे होते. जेवायला ते घोलपला स्वत:च्या स्वयंपाकघरात घेऊन बसले. नंतर त्यांच्या आईला जेव्हा हे कळले तेव्हा भाऊरावांना तिचा सणसणीत मार खावा लागला.

एकदा ते मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या उद्घाटनाला जाऊन आले. त्यामुळे जेवणापूर्वी त्यांनी आंघोळ करावी असा हुकूम निघाला. भाऊराव अस्पृश्यतेच्या विरूध्द होते. त्यांनी आंघोळीस नकार दिला. शिक्षा म्हणून जेवण नाकारले गेले. जेवणाच्या खोलीच्या दारे खिडक्या बंद केल्या. त्याचा निषेध म्हणून भाऊरावांनी खिडकीची काच फोडली. आत शिरले व ते जेवले. त्यावेळी अण्णासाहेब लठ्ठे बोर्डिंग प्रमुख होते. एरवी भाऊराव त्यांना खूप मानत. पण यावेळी त्यांच्यापुढेही नमले नाहीत. त्यांना बोर्डिंगमधून काढून टाकले. पण ते डगमगले नाहीत.

सत्यशोधक भाऊराव

ही शिक्षा भाऊरावांना उपकारकच ठरली. या तरूणाची ध्येयनिष्ठा, निर्भयता व बंडखोरवृत्ती शाहु महाराजांच्या नजरेत भरली. त्यांनी भाऊरावांना आपल्या वाड्यावरच ठेवून घेतले. भाऊरावांच्या जीवनावर या थोर समाजक्रांतिकारक राजाचा खूप प्रभाव पडला. भाऊराव सत्यशोधक समाजाच्या चळवळीत खेचले गेले. सत्यशोधक शिकवणुकीने त्यांना कायमचे झपाटले.

अनेक वर्षे वेगवेगळ्या कामासांठी ते हिंडले. पण त्यावेळीही ते सत्यशोधक विचाराचा प्रचार करत असत. लोकांमध्ये जागृती करण्यासाठी तमाशा कलापथकांचे कार्यक्रम ते भरवत. मध्यंतरात लोकांशी बोलत. गावातून भाकऱ्या गोळा करून एकत्र जेवत. त्यामुळे लोकांच्या जीवनाचे आणखी जवळून दर्शन झाले. त्यातून त्यांना खूप शिकता आले. सामाजिक विषमतेची अमानुषता त्यांना जागोजाग दिसली. एका गावात तहानेने व्याकूळ झालेल्या माणसाला लोक पाणी देत नव्हते. कारण त्याची जात अस्पृश्य मानलेली होती. ते पाहिल्यावर भाऊराव संतापले. त्यांनी पाणी ओढायचा रहाट मोडून विहीरीत फेकून दिला. सज्जनगड, औदुंबर ही धार्मिक क्षेत्रे. तिथे प्रसाद वाटपात वा जेवणाच्या वेळी उच्च वर्णियांकडून जातिभेद केला जात असे. या प्रथांना भाऊरावांनी प्रखर विरोध केला.

भाऊराव स्वत: शिक्षक बनले. साताऱ्यात खासगी शिकवण्या घेऊ लागले. मुलांच्या शिक्षणाकडे कुठे लक्ष देण्याची गरज आहे हे त्यांना जाणवले होते. ते चांगले शिक्षक आहेत असे पालक म्हणू लागले. एका शिकवणीत त्यांना संस्कृत शिकवावे लागे. त्यांचे स्वत:चे संस्कृत कच्चे होते. ते स्वत: एका शास्त्र्याकडे संस्कृत शिकायला जात. अभ्यास करत.



मग शिकवणी घेत. इंग्रजांना मराठी शिकवत. पहाटेपासून दिवसभर ते काम करत. त्या काळी सरकारी कारकुनाला महिना पगार १५ ते २० रूपये असे. तेव्हा शिकवणीतून त्यांचे उत्पन्न ९० रूपये होते. पण त्या पैशात ते अडकले नाहीत.

शैक्षणिक क्रांतीचा नवा मार्ग

शिकण्यासाठी ज्यांच्याकडे पैसाच नाही अशा लोकांसाठी आपण काही तरी केले पाहिजे ही त्यांची तळमळ होती. बहुजन समाजाला शिक्षण मिळाले तर त्यांचे दारिद्र्य व मागासलेपणाही दूर होईल, माहिती मिळेल, जीवनाला उपयोगी पडणारी नवनवी कौशल्ये त्यांच्या हाती येतील, लोकांचा आत्मविश्वास व स्वाभिमान वाढेल हे भाऊरावांनी ओळखले.

जगण्यासाठी उपयुक्त असे शिक्षण जनतेला सहजासहजी मिळावे आणि त्यांचे दारिद्र्य त्या शिक्षणाआड येऊ नये. अशा मार्गाचा शोध भाऊराव घेऊ लागले.

पोटासाठी भाऊरावांनी अनेक छोटीमोठी कामे केली. विमा एजंट व कृषी-सुधारणा एजंट म्हणून गावोगावी ते फिरले. ओगले व किर्लोस्कर या मराठी उद्योजकांकडे विक्री व्यवस्थापक म्हणून काम केले. पण हे करतानाही त्यांनी सामाजिक कार्य चालू ठेवले. या उद्योगपतींनी नफ्याचा काही भाग दीनदुबळ्यांच्या शिक्षणावर खर्ची घालावा असा प्रयत्न त्यांनी सतत केला. कारखान्यातल्या कामगारांना संघटितही केले.

त्या काळी किर्लोस्कर लोखंडी नांगर तयार करत असे. पण शेतकरी लोखंडी नांगर वापरायला तयार होत नव्हते. तो तिक्ष्ण फाळ जमीनीच्या पोटात खुपसला तर ती काळी आई आपल्यावर कोपेल असे त्यांना वाटे. भाऊरावांनी खूप प्रयत्न करून या भ्रामक समजुती दूर केल्या. या नांगराचे फायदे पटवले. लोक मग तो नांगर वापरू लागले. कंपनीला खूप उत्पन्न मिळाले.

पण कोणत्याच उद्योगपतीने गरिबांच्या शिक्षणासाठी ठोस कार्य करण्याची भाऊरावांची अपेक्षा पूर्ण केली नाही. कूपर या उद्योगपतीने "गरीब मुलांसाठी वसतिगृह व कामगारांना नफ्याचा वाटा देतो" असे सांगून भाऊरावांना आपल्या नोकरीत बोलावले. भाऊराव कामगारांसह तिथे आले. पण कुपरने आपला शब्द पाळला नाही. भाऊरावांनी ठरवले, यापुढे भांडवलदारांवर भिस्त ठेवायची नाही.

१९१० पासून दूधगाव येथे चाललेल्या विद्यार्थी आश्रमाचा अनुभव त्यांच्या गाठीशी होता. आधी तिथे रात्री मुलांच्या अभ्यासाची व मग जेवणाचीही सोय करण्यात आली होती. मिशनऱ्यांच्या शाळा व तेथील

समतापूर्ण वागणूक त्यांनी पाहिली होती. तशीच समर्पित भावनेने काम करण्याऱ्या कार्यकर्त्यांची फळी उभारायची हे भाऊरावांच्या मनाने घेतले. शाहू महाराजांनी सुरू केलेली वसतिगृहांची चळवळ त्यांच्या समोर होती. बहुजन समाजाच्या शिक्षणाचा वेगळाच मार्ग त्यांनी शोधला.

मध्यंतरीच्या काळात भाऊरावांना गरीब वर्गातून खूप पाठिंबा तयार झाला होता. याबाबतचा एक प्रसंग खूप बोलका आहे. कोल्हापूर येथे एका पुतळ्याला डांबर फासण्याचे प्रकरण झाले. त्यांत लठ्ठेंविरूध्द खोटी साक्ष द्या असे दडपण भाऊरावांवर आले. लालूच दाखवली गेली. पण भाऊरावांनी ठाम नकार दिला. शेवटी त्यांच्यावरही एक खोटी केस केली गेली. त्यांच्याविरूध्द एक साक्षीदार आणला गेला.

पण तो समोर भाऊरावांना पाहताच ओरडला, "कोण? पाटील मास्तर तुम्ही?" त्यानी भाऊरावांच्या पायावर लोळण घेतली. त्याने पोलिसांना साफ सांगितले, "आमच्या मातंग वाड्यात येऊन गरीब मुलांना हा मोफत शिकवतो. माझी मान गेली तरी चालेल पण या भल्या माणसाची मान अडकवण्यासाठी मी खोटी साक्ष देणार नाही."

बहुजनांसाठी शिक्षणाची चळवळ

नव्या पध्दतीने बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्याचा निर्धार त्यांनी केला. तोच त्यांच्या जीवनाचा कायमचा ध्यास झाला.

१९१९ साली कराड तालुक्यातील काले या गावी सातारा जिल्हा सत्यशोधक समाजाची परिषद झाली. त्यात भाऊरावांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करण्याचा ठराव मांडला. तो मोठ्या उत्साहाने मंजूर झाला. काले व नेर्ले (ता.वाळवा) येथे संस्थेचे कार्य सुरू झाले.

येथे सगळ्या विद्यार्थ्यांचे रहाणे, जेवण मोफत होते. त्याच्या मोबदल्यात त्यांनी थोडेफार श्रम तेवढे करायचे होते. गरिबांच्या मुलांची यातून मोठीच सोय झाली. भाऊरावांचा हुरूप वाढला. हाच प्रयोग मोठ्या प्रमाणावर सातारा शहरात करण्याचे ठरवले. १९२७ साली त्यांचे हे स्वप्न साकार झाले. शाहू बोर्डिंगची स्थापना झाली. खुद्द महात्मा गांधींनी त्याचे उद्‌घाटन केले. बागेत पाण्याने भरलेल्या विशाल विहिरी होत्या, दाट वृक्षराजी होती, सुस्वर गाणारे पक्षी होते. फुलेफळे होती.



अठरापगड जातींच्या होतकरू मुलांना हा एक हक्काचा निवारा मिळाला. त्यात मराठा, ब्राम्हण, जैन, मुस्लिम, महार, मांग, चांभार, रामोशी, ढोर, नट अशा सगळ्या जातींच्या गरीब कुटुंबातून आलेल्या मुलांचा भरणा होता. तेथे कोणीही कोणापेक्षा वरचा नव्हता की खालचा नव्हता. सगळेजण बरोबरीच्या नात्याने एकत्र राहत, एकत्र राबत, एकत्र जेवत, एकत्र खेळत आणि एकत्र अभ्यास करत.



कोणत्याच कामासाठी तेथे पगारी नोकर नव्हते. सगळी कामे स्वत: विद्यार्थीच करत. कोणते काम हलक्या दर्जाचे मानले जात नसे. सर्वांनीच आळीपाळीने स्वयंपाक करायचा, भांडी घासायची, झाडलोट करायची, जमिनीची मशागत करून भाज्या पिकवायच्या, आपली गरज भागून उरतील त्या बाजारात जाऊन विकायच्या, बाजारहाट करायचा. साधेपणान रहायचे, एकमेकांना पडेल ती मदत करायची.

गावोगाव हिंडून भाऊरावांनी गरीब घरातील हुशार व होतकरू मुले हेरली. त्यांना आपल्या बोर्डिंगात ठेवले. त्यांचा शिक्षणाचा सर्व खर्च पत्करला.

भाऊरावांचा हा प्रयोग अभुतपूर्व होता. देशात त्याला कुठेही तोड नव्हती. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी या बोर्डिंगला भेट दिली. त्यावेळी ते म्हणाले, " देशाच्या प्रगतीला खीळ घालणाऱ्या जातिभेदांच्या मुळावर भाऊरावांनी येथे कुऱ्हाड चालवली आहे. संस्थेपाशी पैसा कमी असला तरी नीटनेटकेपणा, शिस्त, स्वच्छता, उत्साह आणि एकजूट वाखणण्याजोगी आहे. राजा-महाराजांनाही जे जमणार नाही ते येथे सामुदायिक प्रयत्नातून उभे राहिले आहे.

रयतेचा वटवृक्ष

संस्थेच्या नावातील रयत शब्द महत्वाचा होता. या शाळा श्रीमंतांसाठी नव्हत्या. त्या शेतकरी व कष्टकरी घरातल्या मुलांसाठी होत्या. रयतेवर संस्थेचा विश्वास होता व भिस्तही होती. "रयत हे माझे भांडवल आहे." असे भाऊराव नेहमी म्हणत. डेरेदार व अनेक पारंब्यांचे वडाचे झाड हे रयत शिक्षण संस्थेचे बोधचिन्ह आहे. हजार हातांनी रयतेने तोलून धरलेल्या भाऊरावांच्या कार्याचेच ते प्रतिक आहे. अशाच एका वडाच्या झाडाखाली शाहू बोर्डिंगची सुरूवात झाली होती. कोरड्या भूमीतही खोल मुळे रोवून तग धरणारे, वाढणारे-विस्तारणारे झाड. वडाच्या फांद्यांप्रमाणे संस्थेच्या शाखांनीही स्वतःचे स्वतंत्र आधार आपापल्या ठिकाणी निर्माण केले.

माधुकरी मागून शिकण्याचा मार्ग भाऊरावांना नामंजूर होता. ते म्हणत, " शेतकरी कधीच भिक मागत नसतो. तो सदैव दुसऱ्यांना देत असतो. कष्टातून स्वाभिमान, आत्मविश्वास व धैर्य वाढते. म्हणून कष्ट करून कमवा आणि स्वमिळकतीतून शिका, हे रयत शिक्षण संस्थेचे ब्रिद

वाक्य आहे." सर्वांना शिक्षण मिळायचे तर श्रीमंतांची त्यावरील मक्तेदारी मोडलीच पाहिजे. पैशाची मातब्बरी निकालात काढली पाहिजे. भाऊरावांनी ते केले.

स्वाभिमानी शिक्षण

सर्वांनी एकत्र कष्ट करण्यातून उच्चनिचता नष्ट होते. श्रमाची प्रतिष्ठाही उंचावते. या प्रयोगामागचे सूत्र हेच होते. "आम्हाला पडीक जमीन द्या. आम्ही तिला उपजावू करू", असे भाऊराव म्हणत. ते त्यांनी खरे करून दाखवले. वसतिगृहातील मुलांच्या मदतीने माळरानात शेती पिकवली. भाऊराव त्यांचे आजोबा देवगोंडा ह्यांची एक आठवण नेहमी सांगत. देवगोंडांनी भावाला स्वतःच्या जमिनीचा तुकडा दिला होता. त्याबदल्यात त्याची माळावरची जमीन घेतली. ती जमीन त्यांच्या जमिनीला लागून होती. त्या एकत्रित जमिनीवर त्यांनी खूप कष्ट घेतले. काही वर्षातच तिला सुपीक बनवले. नापीक जमिनीतून पीक काढणे आणि निरक्षर समाजाला सुशिक्षित बनवणे ह्या भाऊरावांसाठी एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या.

भाऊरावांना गांधीजींच्या रचनात्मक कार्यापासून प्रेरणा मिळालेली होती. भाऊरावांनी पुण्यात युनियन बोर्डिंग हाऊसची स्थापना केली. समाजाने अस्पृश्य ठरवलेल्या जातींतील मुले तिथे सवर्ण मुलांसोबत राहू लागली. एकत्र खाऊ, पिऊ, राहू लागली. या सहजीवनाने गांधीजी खूप प्रभावित झाले व त्यांनी हरिजन सेवक फंडातून संस्थेला काही वर्षे अर्थसाह्य केले. साबरमती आश्रमात जे स्वतःला जमले नाही ते भाऊरावांनी करून दाखवले, असे ते म्हणाले. भाऊरावांचे हे कार्य म्हणजे

नव्या भारताची उभारणी होती. त्याबद्दल त्यांचे गांधीजींनी कौतुक केले.

प्राथमिक शिक्षण : शिक्षणाचे प्रवेशव्दार

भाऊरावांनी सर्वप्रथम प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. तेच त्यांच्या मते शिक्षणाचे प्रवेशव्दार होते. सर्वांना शिक्षण देण्याची कल्पनासुध्दा परकीय राज्यकर्त्यांना नको होती. स्वातंत्र्य चळवळीच्या नेत्यांनाही शहरी लोकांचे उच्च शिक्षणच अधिक महत्वाचे वाटत होते. गांधीजींनीच पहिल्यांदा खेडुतांच्या शिक्षणाकडे लक्ष वेधले.

समाजाचे वरचे थर शिकले की नंतर शिक्षण आपोआप खालच्या थरांकडे झिरपत जाईल असे काही जणांचे मत होते. जोतिरावांनी ते खोटे असल्याचे सांगितले. 'येथील समाजाचे थर पाणीबंद असल्यामुळे झिरपणी शक्यच नाही, तेव्हा खालच्या थरांच्या शिक्षणाची जबाबदारी वरच्यांवर ठेवून चालणार नाही' हे त्यांनी सांगितले होते. भाऊरावांना ते पटले होते.

सरकारने प्राथमिक शिक्षणाचे विधेयक मांडले. लोकांनी त्यास पाठिंबा द्यावा यासाठी भाऊराव गावोगाव फिरले. त्यांनी तीनशेहून अधिक सभा घेतल्या. त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. पण भाऊराव उमेद हरले नाहीत.

आणखी एक योजना सरकारने आणली. शाळा नसेल तिथे शाळा काढणाऱ्या संस्थेला आर्थिक मदत करण्याची. तिचे ऐच्छिक शाळा योजना, असे नामकरण केले. भाऊरावांना कंबर कसली. जेथे जायला धड वाटाही नव्हत्या, तेथे कधी घोड्यावर तर कधी बैलगाडीत बसून भाऊराव जात. वर्षभरात त्यांनी सातारा जिल्हयात दुर्गम भागात साठ शाळा

उघडल्या. त्या उत्तम प्रकारे चालवल्या.

या शाळांत खेडुतांच्या मुलांना फी पडत नसे. रयत शिक्षण संस्थेने नेमलेले शिक्षक तेथे शिकवत असत. शिक्षकांचा पगार सरकार देई संस्था दरवर्षी काही कागद पेन्सिली व पाठ्यपुस्तके पाठवी. संबंधित खेड्याने शाळेसाठी सोयीची जागा आणि शिक्षकाच्या राहण्या-जेवणाची सोय करायची. अशी ही योजना होती.

शाळा : सामुदायिक जीवनाचे केंद्र

शिकवण्याचे काम शिक्षकाला वर्गात तसेच वर्गाबाहेरही करावे लागत असे ते म्हणत. भाऊरावांची शिक्षकाविषयी अपेक्षा काय होती? तर त्याने समाज जीवनात मिसळावे. लोकांचे किरकोळ भांडणतंटे सोडवावेत. त्यांना कलह व कज्जेदलाली टाळायला सांगावे. उत्तम शेती कशी करावी व कंपोस्ट खत कसे बनवावे हे शेतकऱ्यांना शिकवावे. भाऊरावांचे शिक्षकांना असे सांगणे होते की त्यांनी ग्रामसुधारणेचा आराखडा तयार करावा. गावकऱ्यांच्या सहकार्याने तो अंमलात आणावा. वेगवेगळे विशेष दिवस साजरे करण्यात पुढाकार घ्यावा. गावाला मुख्य सडकेशी जोडणारा रस्ता किंवा तलाव ही कामे श्रमदानाने करवून घ्यावीत. गाव स्वच्छ ठेवण्याचे उपक्रम राबवावेत. स्वतःचे प्रश्न समजून घेऊन ते स्वतःच सोडवण्याची सवय लोकांना लावावी. थोडक्यात शाळा ही त्या गावच्या

भाऊरावांच्या या कार्यात त्यांना अनेकांचे सहकार्य मिळाले. त्यात शाळा सामुदायिक जीवनाचे केंद्र व्हावी असा भाऊरावांचा प्रयत्न होता.

घामाचे दाम देवून शिक्षण घेण्याचे तत्व भाऊरावांनी उच्च शिक्षणासाठीही अमलात आणले. गांधीजींच्या स्मरणार्थ १०१ माध्यमिक शाळा सुरू करण्याची घोषणा त्यांनी केली होती. माध्यमिक शिक्षण ही केवळ शहरी बाब राहू नये. ते खेड्यात पसरावे ग्रामीण भागातले, तेथील जीवनात रमणारे व वाहून घेऊन काम करणारे शिक्षक तेथे शिकवायला असावेत अशी भाऊरावांची कल्पना होती.

अधिक धान्य पिकवा असे आवाहन सरकारने केले त्यास जमीन द्या, धान्य पिकवू, असा प्रतिसाद रयत शिक्षण संस्थेने दिला. शेतकी शाळांचा यातून विकास झाला. साखर कारखान्यांच्या भागधारक शेतकऱ्यांकडून टनामागे चार आणे देणगी घेतली. ऊस कामगारांच्या मुलांसाठी मोफत शिक्षणाची सोय संस्थेने केली. त्या मुलांना कारखान्यात काम करण्याची संधी दिली. त्यातून प्रत्यक्ष कार्यानुभव देण्याचा खटाटोप भाऊरावांनी केला. त्या काळी महाविद्यालयीन शिक्षण समाजाला फारसे उपयोगी नव्हते. पण भाऊरावांनी खेडोपाडी कॉलेज उघडली. उच्च शिक्षणाचे शहरी, श्रीमंती, परीक्षाकेंद्री व परीटघडी स्वरूप बदलण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. पदवीधर मुले शरीर श्रमाला दुरावतात. ती श्रमाचा व श्रमिकांचाही दुस्वास करू लागतात. पांढरपेशा नोकऱ्यांच्या नादी लागतात. बेकारीने हताश होतात. खेड्यात राहून करण्याजोगे त्यांना काहीच दिसत नाही, सुचत नाही. ही परिस्थिती भाऊरावांना बदलायची होती. "कष्ट करून मिळवा, स्वमिळकतीतून शिका, माळरानाचे रूपांतर शेतजमीनीत करा" हा त्यांचा मंत्र होता. त्या मंत्राने त्यांनी पदवीधरांच्या पिढ्या निर्माण केल्या. अशा पदवीधरांची पहिली तुकडी बाहेर पडली.

शिक्षणसंस्थेविषयी इतकी कृतज्ञ होती की त्यांनी त्यांचे जीवन संस्थेला समर्पित केले.



शिक्षकाला आपला विषय तर उत्तमपणे शिकवता आलाच पाहिजे. पण विद्यार्थ्याला अधिक चांगला शेतकरी होण्याचे शिक्षणही देता आले पाहिजे. एक शिक्षकी शाळांच्या शिक्षकांना तर शेतकी, सुतारकी, लोहारकी, ग्रामविकास या सर्वच विषयांचे प्रशिक्षण मिळाले असले पाहिजे. भाऊरावांनी त्यांचे हे मत प्रत्यक्षात आणण्यासाठी अध्यापक प्रशिक्षण विद्यालये काढली. त्यापैकी बहुतेक विद्यालये ग्रामीण भागात होती. त्यांचे अभ्यासक्रम निवडताना स्थानिक गरजांकडे विशेष लक्ष दिले होते. उदाहरणार्थ सांगली जिल्ह्यात आष्टा भागात धनगरांची वस्ती मोठी असल्याने तेथे काढलेल्या प्रशिक्षण विद्यालयात लोकर कातणे, विणणे याचे शास्त्रीय शिक्षण देण्याची सोय केली होती.

हे शिक्षण देण्यासाठी भास्करराव जाधव, जेधे-जवळकर, महात्मा गांधी, महर्षि शिंदे, रावबहाद्दूर काळे, संत गाडगेबाबा यांसारखी थोर मंडळी तर होतीच पण मुख्य म्हणजे रयतेने त्यांना कधीच काही कमी पडू दिले नाही. प्रत्येक शेतकरी कुटुंबाने मूठ मूठ धान्य घालून संस्थेची कणगी सदैव शिग-ओसांड भरलेली ठेवली. भाऊरावांनी नवे शैक्षणिक साहस करायचे आणि लोकांनी त्यांच्या पाठीशी उभे रहायचे हा क्रम सतत सुरू होता. यातून संस्था सतत कलेकलेने वाढत गेली.

भाऊरावांच्या पत्नी लक्ष्मीबाईंनी हे कार्य आपलेच मानले. बोर्डिंगातल्या मुलांवर त्यांनी पोटच्या पोरांगत माया केली. सधन पित्याने दिलेले ऐंशी तोळे सोने त्या पोरांच्या पोटासाठी त्यांनी अधूनमधून गहाण टाकले. मंगळसूत्रही शिल्लक ठेवले नाही.

दगदगीचे दिर्घायुष्य काढल्याने भाऊराव शरीराने थकले. पण बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या त्यांच्या योजना कधीच थंडावल्या नाहीत. पद्मभूषण देऊन भारत सरकारने त्यांना गौरवले. पुणे विद्यापीठाने मानार्थ डी.लिट्. देऊन त्यांचा सन्मान केला. महाराष्ट्र सरकारनेही सत्कार केला. एक रूपयापेक्षा कोणाकडूनच जास्त न घेण्याची भाऊरावांची अट पाहून अहमदनगर जिल्ह्यातील लोकांनी त्यांना एक लाखाचा गौरव निधी अर्पण केला.

९ मे १९५९ रोजी भाऊरावांची प्राणज्योत मालवली.

रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आज महाराष्ट्रात सर्वत्र पोचले आहेत. भाऊरावांनी दिलेला ध्येयवाद ते जपताहेत. त्यांची आठवण ठेऊन आपल्या भूमिका पार पाडत आहेत. उद्योगधंदे करणाऱ्या विद्यार्थ्यांना भाऊरावांनी आधार दिला, प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भाऊरावांनी पाठिंबा दिला. या संस्थेने भुमिगतांना आश्रय

दिला होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणाद्वारे राष्ट्रबांधणी करण्याच्या कार्यात तिने झोकून दिले आहे.

ग्रामीण भागातील मानवी शक्ती गावातच राहाव्यात आणि त्यांनी गावाचा कायापालट करावा यासाठी भाऊरावांनी जो मार्ग अवलंबला तसा दुसरा मार्ग कोणीच अजून दाखवलेला नाही. कष्टकऱ्यांच्या सहकारी संस्थेकरवी देवापूरनजीक राजेवाडी तलावाच्या गाळाची जमीन भाऊरावांनी कसायला घेतली आणि शेजारपाजारच्या खेडयांचा चेहरामोहराच पार बदलून टाकला. हे उदाहरण आजही अनुकरणीय आहे.

ग्रामीण विकासासाठी शिक्षण व शिक्षक कसे हवेत?

लोकशाहीसाठी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आवश्यक असते. ते कसे साध्य होईल? सामाजिक आरिष्टांचा मुकाबला शिक्षणातून कसा करता येईल? येथे जाती-धर्म-निरपेक्ष सहजीवन नांदून राष्ट्रीय एकजूट कशी साधेल? अभिजन व सामान्यजन यांच्यातील अंतर कसे उणावेल? या सर्वच प्रश्नांच्या उत्तरांसाठी आपल्याला कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्राकडे व कार्याकडे पहावे लागेल. तेथेच ती सापडू शकतील.

थोरांचे सहकार्य
लाखोंचा सहभाग

"साक्षर झालेल्या प्रौढांना पुन्हा निरक्षरतेकडे लोटायचे नसेल ता त्यांना वाचन व लेखन सतत चालू ठेवता आले पाहिजे. म्हणून, या साक्षरांना तसेच गावातील अन्य प्रौढ शिक्षितांना वाचनाची सोय उपलब्ध करून देणारी गाव-वाचनालये असणे अत्यावश्यक होते आणि आमचे शाळा, शिक्षक अशी गाव-वाचनालये यशस्वीरित्या चालवत आहेत.

हे शिक्षक गावात मार्गदर्शकाचे कामही करतात. अनावश्यक कोर्टकज्ज्यात अडकण्यापासून लोकांना ते परावृत्त करतात. शेतकऱ्यांना ते सुधारित शेतीचे व कंपोष्ट खत इ.तंत्राचे महत्व समजावून सांगतात. लोकांच्या मनातील अंधश्रध्दा दूर करण्याचे प्रयत्नही करतात. हे शिक्षक ग्रामसुधारणेचा आराखडा तयार करतात. गावाला मुख्य सडकेशी जोडण्याचा रस्ता किंवा तलाव बांधण्याची कामे लोकांकडून श्रमदानाने करून घेतात. गाव स्वच्छ ठेवण्याचे उपक्रम राबवतात. वेगवेगळे विशेष दिवस साजरे करण्यात पुढाकार घेतात."

(रयत शिक्षण संस्थेचा अहवाल : १९५३-५४)